एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, लेबर कॅम्प, धारावी रोड, माटुंगा, मुंबई- ४०० ०१९.

---

**महानिर्मिती जाहिरात क्र. ०२(Feb)/२०१८**

## उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (Dy.Executive Engineer (Civil)) व सहाय्यक अभियंता (स्थापत्य) (Assistant Engineer(Civil)) या रिक्त पदांची सरळसेवा भरती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीतील उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (Dy.Executive Engineer (Civil)) व सहाय्यक अभियंता (स्थापत्य) (Assistant Engineer (Civil)) या रिक्त पदांकरिता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन (Online) पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन (Online) पध्दतीने अर्ज सादर करण्याबाबतच्या सविस्तर सूचना महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या **http://www.mahagenco.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने संपूर्ण जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.

१) महानिर्मिती कंपनीच्या महाराष्ट्रातील सर्व औष्णिक विद्युत केंद्रातील अनुशेष तसेच सामाजिक व समांतर आरक्षण त्याचप्रमाणे रिक्त पदांची संख्या विचारात घेऊन उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (Dy.Executive Engineer (Civil)) यांची ०८ व सहाय्यक अभियंता (स्थापत्य) (Assistant Engineer (Civil)) यांची ३६ रिक्त पदे भरावयाची आहेत.

**उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (Dy.Executive Engineer (Civil)) रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे.**

| पदाचे नाव व समांतर आरक्षण | अ.ज. (ST) | भ.ज.-क (NT-C) | इ.मा.व. (OBC) | खुला (Open) | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| **उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (Dy.Executive Engineer (Civil))** | ०१ | ०१ | ०१ | ०५ | **०८** |
| **महिला आरक्षण ३०%** | ०० | ०० | ०० | ०२ | **०२** |
| **सर्वसाधारण उमेदवार** | ०१ | ०१ | ०१ | ०३ | **०६** |

**सहाय्यक अभियंता (स्थापत्य) (Assistant Engineer (Civil)) रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे.**

**श्रेणी :- सामान्य उमेदवार (महानिर्मिती कंपनीमधील कार्यरत कर्मचारी वगळून )**

| पदाचे नाव व समांतर आरक्षण | अ.ज. (ST) | वि.जा.-अ (VJ-A) | भ.ज.-ब (NT-B) | भ.ज.-क (NT-C) | भ.ज.-ड (NT-D) | वि.मा.प्र. (SBC) | खुला (Open) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **सहाय्यक अभियंता (स्थापत्य) (Assistant Engineer (Civil))** | ०६ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०२ | २३ | **३५** |
| **महिला आरक्षण ३०%** | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०७ | **१०** |
| **खेळाडू ५%** | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | **०१** |
| **सर्वसाधारण उमेदवार** | ०४ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | १५ | **२४** |

**श्रेणी :- महानिर्मिती कंपनीमधील कार्यरत कर्मचारी**

| जात प्रवर्ग | खुला (Open) | एकूण |
|---|---|---|
| **एकूण रिक्त जागा** | ०१ | **०१** |
| **सर्वसाधारण** | ०१ | **०१** |

**अपंग उमेदवारांकरीता आरक्षित पदे (केवळ एक पाय बाधीत, एक हात बाधीत व कर्णबधीर स्वरुपाचे अपंगत्व असलेले उमेदवार)**

| पदाचे नाव | आरक्षित पदे |
|---|---|
| सहाय्यक अभियंता (स्थापत्य) (Assistant Engineer (Civil)) | ०१ |

**समांतर आरक्षणासंबंधीचे अटी / नियमः-**

१) शासन निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्रक्र४१५/का-२, दिनांक २५/०५/२००१ मधील तरतुदीनुसार महिलांसाठी ३० टक्के आरक्षण राहील. (महिला आरक्षणांतर्गत महिला उमेदवारांनी अर्ज करतांना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे जाहिरातीस अनुसरुन कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे. तसेच खुल्या (Open) प्रवर्गात अर्ज सादर करणाऱ्या महिला उमेदवारांकरीता त्यांनी खुल्या (Open) प्रवर्गाचेच उपरोक्त शासन निर्णयानुसार विहीत नमून्यातील उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे जाहिरातीस अनुसरुन कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे).

२) अपंग प्रवर्गासाठी एक पाय बाधित, एक हात बाधीत व कर्णबधीर याकरीता एकूण ३ टक्के आरक्षण राहील. अपंग प्रवर्गाच्या उमेदवाराजवळ अपंगत्वाचे प्रमाण ४० टक्क्यापेक्षा कमी अपंगत्व नसल्याचे कार्यालयीन परिपत्रक कार्मिक मंत्रालय, भाषा सरकार नवी दिल्ली क्र.३६०३५/३/२००४ ईएसटीटी (आरईएस), दि.२९/१२/२००५ प्रमाणे मेडिकल बोर्डाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. अशा पात्र उमेदवारांमधून शासन पत्र क्र.अपंग-२००२/प्र.क्र.३३१/सुधार-३, दि.०७/०६/२००६ अनुसार निवडीस / नियुक्तीस पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. अपंग उमेदवारांजवळ कायमस्वरुपी अपंग असल्याचे प्रमाणपत्र जाहिरातीस अनुसरुन कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी वैध असलेले सादर करणे आवश्यक आहे. सदर बाबतीत प्रमाणपत्र सादर करणेकरीता कोणत्याही मुदत वाढीच्या विनंतीची दखल महानिर्मिती कंपनीतर्फे घेतली जाणार नाही.

३) अ) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी महाराष्ट्र शासन निर्णय क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.०१.०७.२०१६ अनुसार ५% आरक्षण राहील. उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य ) (Dy.Executive Engineer (Civil)) या पदाकरीता खेळाडू आरक्षणातंर्गत केवळ आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील वैयक्तिक अथवा सांघिक क्रिडा स्पर्धांमध्ये प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त केलेल्या अथवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त केलेल्या उमेदवारांनीच अर्ज करावेत. तर सहाय्यक अभियंता (स्थापत्य) (Assistant Engineer (Civil)) या पदाकरीता खेळाडू आरक्षणातंर्गत केवळ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील वैयक्तिक अथवा सांघिक क्रिडा स्पर्धांमध्ये प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त केलेल्या अथवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त केलेल्या उमेदवारांनीच अर्ज करावेत. त्याचप्रमाणे उमेदवारांनी वेतनगट-१ म्हणजेच गट-अ मधिल उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य ) (Dy.Executive Engineer (Civil)) या पदाकरीता व वेतनगट-२ म्हणजेच गट-ब मधिल सहाय्यक अभियंता (स्थापत्य) (Assistant Engineer (Civil)) या पदाकरीता खेळाडू आरक्षणांतर्गत अर्ज सादर करताना ते उपरोक्त शासन निर्णयातील सुधारीत तरतुदींनुसार विभागीय उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. करीता, खेळाडू उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीवेळी विभागीय उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा यांनी क्रिडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू उमेदवार वेतनगट-१ म्हणजेच गट-अ मधिल उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य ) (Dy.Executive Engineer (Civil)) या पदाकरीता व वेतनगट-२ म्हणजेच गट-ब मधिल सहाय्यक अभियंता (स्थापत्य) (Assistant Engineer (Civil)) या पदाकरीता (उमेदवार ज्या पदाकरीता अर्ज सादर करीत आहे त्याप्रमाणे) खेळाडू आरक्षणांतर्गत निवडीकरीता पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेला अहवाल सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा उमेदवाराची निवड तात्काळ रद्द करण्यात येईल व सदर प्रकरणी कोणत्याही मुदत वाढीच्या विनंतीची दखल महानिर्मिती कंपनीतर्फे घेतली जाणार नाही.

ब) उमेदवाराने ज्या खेळात प्राविण्य मिळाले त्या खेळाचे नाव, ज्या गावात खेळ आयोजीत केले होते त्या गावाचे / शहराचे नाव व ज्या तारखेस खेळ आयोजित केले होते तो दिनांक नमूद करावा. उपरोक्त माहिती पैकी कोणतीही माहिती भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर चूकीची आढळून आल्यास त्या उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल. उमेदवाराने ५% खेळाडू आरक्षणातंर्गत ऑनलाईन भरलेली माहितीच्या अनुषंगाने मुळ कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील. त्याव्यतिरिक्त इतर कागदपत्रे सादर केल्यास ग्राहय धरण्यात येणार नाही.

४) समांतर आरक्षणामध्ये पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरची पदे ही त्या त्या सामाजिक प्रवर्गातुन नियमानुसार भरण्यात येतील.

